# भारतीय ज्ञान परंपरा आणि नाभिक समाज

-सौ. अर्चना किशोर येऊलकर

**सारांश :**

प्राचीन काळापासून आपला देश उच्च मानवी मुल्य आणि परंपरा जोपासनारा देश आहे. भारताला ज्ञानाची समृद्ध परंपरा आहे. आज ती शोधण्याची आणि पुनर्संचयित करण्याची गरज आहे. त्या करिता राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत भारतीय ज्ञान प्रणालीवर भर देण्यात आला आहे. भारतीय ज्ञान परंपरा ही अत्यंत समृद्ध अशी आहे. ज्ञान आणि विज्ञान, लौकिक आणि पारलौकिक कर्म, धर्म तसेच भोग आणि त्याग यांचा अद्भूत समन्वय भारतीय ज्ञान पंरपरेमध्ये आहे. भारतीय ज्ञान परंपरा आजच्या काळातील आव्हानांसाठी मार्गदर्शक आहे. याच आधारावर गावगाड्यातील नाभिक समाजाचा अभ्यास केला आहे. नाभिक समाजाची पूर्वीची स्थिती आणि आजचे बदलले स्वरूप स्पष्ट केलेले आहे. आज नाभिक समाजातील लोकांच्या दृष्टीकोनात बदल झालेला दिसतो. भारतीय ज्ञान परंपरा आणि नाभिक समाजाची परंपरा यांचा समन्वय साधून नाभिक समाजातील व्यक्ती या ज्ञानाचा उपयोग करून नाभिक समाज परिवर्तनाच्या वाटचालीवर आहे.

**बिजशब्द :** भारतीय ज्ञान परंपरा, नाभिक समाज व बदलती परिस्थिती

**प्रस्तावना :-**

भारतीय समाज हा अतिप्राचिन आणि तितकाच गुंतागुंतीचा आहे. भारतीय समाजव्यवस्था ही विविधतेने समृध्द आहे. भारतीय समाज हा जगातील प्राचीनतम समाज आहे. भारतीय समाज व्यवस्था बहुविध स्वरुपाची आहे. एकोणविसाव्या शतकाच्या पूर्वार्धात भारतात बौद्धीक जागृतीची आणि वैचारिक परिवर्तनाची लाट पसरु लागली. आधुनिक जिवनमूल्ये पाश्चात्य शिक्षणाबरोबर भारतात प्रस्तुत होवू लागली. मानवी जीवनाकडे पाहण्याचा सर्वस्वी भिन्न असा बुद्धीवादी, चिकित्सक व मानवतावादी दृष्टीकोन आकार घेवू लागला.

प्राचीन काळापासून आपला भारत उच्च मानवी मूल्यांचा आणि परंपरा जोपासणारा देश आहे. आज जगामध्ये भारताच्या परंपरांना महत्व प्राप्त झाले आहे. भारताला ज्ञानाची समृध्द परंपरा आहे. आज ती शोधण्याची आणि पूनर्संचयित करण्याची गरज आहे. अशयाच भारतीय ज्ञान परंपरेचे स्वरुप पुढीलप्रमाणे-

**संशोधन पद्धती:-**

प्रस्तुत संशोधन जर्नल्स, मासिके, लेखांमधून प्राप्त केलेल्या माहितीवर आधारित आहे. विषयाशी संबंधित पुस्तके आणि इंटरनेटवरील स्त्रोताचा वापर केला आहे.

**भारतीय ज्ञान पंरपरा :-**

जगातील सर्वात जुन्या संस्कृतीमध्ये भारताचे स्थान प्रमुख आहे. सुमारे पाच हजार वर्षापासून भारतीय संस्कृतीने असंख्य तत्वज्ञान, प्रणाली श्रध्दा आणि दिर्घ मानवी इतिहासाला जपले आहे. भारतीय ज्ञान परंपरेची चर्चा करण्यापूर्वी प्रथम ज्ञान म्हणजे काय हे समजून घेणे गरजेचे आहे. म्हणूनच ज्ञान हे असंख्य तथ्ये, सिध्दांत, तत्वे, नातेसंबध श्रध्दा या सर्वांचा संग्रह आहे. जे ज्ञान मानवाला त्यांच्या समस्या आणि कुतुहल पूर्ण करण्यास मदत करते. म्हणूनच ज्ञान मिळविण्यासाठी असंख्य पद्धती उपलब्ध आहे.

आधुनिक काळात केवळ वैज्ञानिक पद्धतीला प्रमाणभूत पद्धतीच्या श्रेणीत ठेवले आहे. परंतु भारतीय ज्ञान परंपरेमध्ये सर्व माध्यम आणि प्रयोगाच्या परिणामांना मान्यता दिल्या गेली आहे. कारण आजच्या काळात प्रत्येक क्षेत्रात संशोधनाची गरज आहे. संशोधनाचे महत्व समजून घेवून प्रत्येक येणाऱ्या संधिंना प्रोत्साहन दिले जात आहे. भारतीय ज्ञान परंपरेचा शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन प्राचीन काळापासून अत्यंत व्यापक राहिला आहे. भारतीय ज्ञान परंपरा ही अत्यंत समृध्द आणि अद्वितीय अशी आहे. भारतीय ज्ञान परंपरेमध्ये ज्ञान आणि विज्ञान, लौकिक आणि पारलौकिक, कर्म आणि धर्म यांचा अद्भुत समन्वय आहे.

सध्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अतंर्गत भारतीय ज्ञान परंपरेच्या अभ्यासावर आणि अध्यापनावर विशेष भर देण्यात आला आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० हे भारताच्या शाश्वत ज्ञान आणि कल्पनांच्या समृध्द प्रकाशात तयार करण्यात आले आहे. या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये भारतीय ज्ञान परंपरेला त्यांच्या स्तंभामध्ये एक मध्यवर्ती आधारस्तंभ मानले गेले आहे.

भारतीय इतिहासात संस्कृतीचे पैलू पूर्वीच्या काळापासून दिसून येते. जिथे संस्कृती सुरु होते तिथे ज्ञान असते आणि ती ज्ञानाची परंपरा अव्याहतपणे सुरु राहते. भारतीय संस्कृती आणि संस्कृतीचा मुलभुत पाया म्हणजे भारतीय ज्ञान परंपरा. भारतीय ज्ञान परंपरा ही प्राचीन काळापासुन भारतात प्रचलित असलेली शिक्षण प्रणाली आहे. त्यामध्ये वेद, वेदांग, उपनिषद, श्रृती, स्मृतिपासून ते तत्वज्ञान धर्मशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, अध्यापनशास्त्र, नाट्य, व्यवस्थापन आणि विज्ञान या विविध शाखांपर्यंत ज्ञानाचा एक विशाल संग्रह आहे. भारतीय

ज्ञान परंपरा ज्ञानाचे प्रतिक आहे ज्यामध्ये ज्ञान आणि विज्ञान, लैकिक आणि आध्यात्मिक कर्म आणि धर्म यांचे उल्लेखणीय एकत्रीकरण आहे.

शतकानुशतके भारतीय ज्ञान परंपरा असंख्य भाषामधून जन्माला आली आणि जोपासली गेली. या भारतीय ज्ञान परंपरेला अनेक विद्वानांनी आकार दिल्यामुळेच ही ज्ञान परंपरा जिवंत आणि अव्याहत सुरु आहे. भारतीय ज्ञान प्रणालीद्वारे ज्ञान हे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरीत होते. ज्ञान हस्तांतरणाची ही एक महत्वपूर्ण पद्धत आहे. वैदिक साहित्य, उपनिषद, वेद आणि उपवेद हे भारतीय ज्ञानव्यवस्थेचा पाया आहे. भारतीय ज्ञान प्रणाली ही भारतीय उपखंडात हजारो वर्षापासून विकसित झाली आहे.

भारतीय ज्ञान प्रणालीचा उद्देश म्हणजे जीवनात समतोल राखणे, सामाजिक, धार्मिक आणि नैतिक मूल्यांची जोपासना करणे, मानवी जिवनासाठी, भविष्यासाठी योगदान देणे होय. भारतीय ज्ञान परंपरेच्या विकास प्रवाहात आपल्याला बौद्धीक आणि वैचारिक सर्जनशिलता स्पष्टपणे दिसून येते. प्राचीन काळापासून भारतीय शिक्षण पद्धतीने जीवनातील नैतीक, भौतिक, आध्यात्मिक, बौध्दीक मुल्यांवर लक्ष केंद्रित केले आहे. ग्रंथज्ञानासोबतच शारिरीक श्रमाचे महत्व भारतीय ज्ञान परंपरेतून अधोरेखित होते. त्याचप्रमाणे भारतीय ज्ञानपरंपरेचा संगम आपल्याला सामाजिक, सांस्कृतिक, वैचारिक आणि सभ्यतेच्या एकतेला प्रतिबिंबित करते. भारतीय ज्ञान प्रणालीच्या सुवर्ण इतिहासाचा अभ्यास केल्यास हे स्पष्ट होते की, प्राचीन काळात या परंपरेचा हेतू ज्ञान संपादन करुन सर्व पैलूंमध्ये विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास करणे, त्यांचा सर्वांगीण विकास करणे होय. अश्या महत्वपूर्ण भारतीय ज्ञान प्रणालीच्या माध्यमातून समाजव्यवस्थेतील नाभिक समाजाचे अध्ययन पुढीलप्रमाणे -

**नाभिक समाज :-**

भारतीय समाज हा अत्यंत प्राचीन आणि संकीर्ण असा समाज आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत भारतीय ज्ञान परंपरेला प्रोत्साहन दिले जात आहे. त्याच अनुषंगाने, नाभिक समाजाची परंपरा, सामाजिक आणि व्यावसायीक भूमिका तसेच पूर्वीचा नाभिक समाज व आजच्या काळातील परिवर्तनशील नाभिक समाज समाजाची वैचारिक स्थिती, समाजव्यवस्थेतील स्थान, आधुनिक शिक्षण, तंत्रज्ञान यांचे थोडक्यात अध्ययन भारतीय ज्ञान परंपरेच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे :-

पूर्वीच्या काळात भारतात वर्ण व्यवस्थेपेक्षा वंशपरंपरा अधिक महत्वाची होती. नाभिक समाजाचा वंश 'नागवंशी' मानला जातो. ज्यामध्ये सम्राट चक्रवर्ती महापद्मानंद, सम्राट चंद्रगुप्त मौर्य, संत सेना महाराज, पंडित चक्रपाणी यासारख्या महापुरुषांचा जन्म झाला. उपाली हा नाभिक जातीचा विद्वान हा बुध्द धर्माच्या वैचारिक प्रणालीच्या पहिल्या विद्वानांपैकी एक होता. या काळात जन्मानुसार आणि व्यवसायानुसार जात निश्चित होवू लागल्यात याच काळात अनेकदा या समाजातील लोकांना जाती व्यवसायावरुन टिंगलटवाळीचा सामना करावा लागे. त्यामुळे आत्मसन्मान दुखावला जायचा.

महाराष्ट्रातील बारा बलुतेदारांपैकी एक जात म्हणून "नाभिक" या समाजाचा समावेश आहे. नाभिक समाजाला परंपरेने काही हक्क मिळाले नसले तरी परंपरेने चालत आलेला जातिनिष्ठ असा व्यवसाय हा समाज करतो. नाभिक समाजाचा केशकर्तण करणे हा परंपरागत व्यवसाय आहे. नाभिक समाजाची संस्कृती, भाषा, परंपरा सण, संस्कार हे इतर समाजाप्रमाणे आढळते. भारतातील सर्व राज्यात विविध नावारुपास असलेला नाभिक समाज आहे. संस्कृत भाषेत नाभिक जातीला नापित असे नाव आहे. नापित्य म्हणजे नाव्ह्याचा धंदा किंवा व्यवसाय होय.

नाभिकांना भारतातील विविध भागात विविध नावाने ओळखले जाते. नापित, न्हावी, वारिक, क्षारक, कारागिर, हजाम, वाडींग, सन्मुख, वालंद, नायीद, म्हाली इ. समाजाच्या दैनंदिन व्यवहारामध्ये नाभिकांचे स्थान कनिष्ठ असले तरी उच्चवर्णीयां एवढीच विद्वत्ता, हजरजबाबीपणा, राजघराण्यांशी जवळचे संबंध आणि सामाजिक कार्यातील सक्रिय सहभागामुळे गावपातळीवर नाभिक समाजाला इतर उच्चवर्णीय घटकांप्रमाणेच महत्व होते.

श्री. क्रुक यांच्या 'The Tribes, and castes of North Western Provinces and oudh' या पुस्तकाचा हवाला देऊन, रसेल सांगतात की, केशकर्तनाचा व्यवसाय हा अत्यंत प्राचीन आहे. नाभिक समाजाचा उगम प्राचीन काळात झाला आहे. १८६० ते १८९० या कालखंडातल्या घटनांचा शोध घेतला तर केशकर्तण करणाऱ्या न्हावी समाजाच्या न्यूनत्वाचा घटनाक्रमाचा अर्थ उमजू लागतो. शहरीकरणाला चालना मिळाल्यानंतर गावगाड्याच्या रुढी, परंपरेच्या जोखडातून बलुतेदार मंडळी मोठ्या प्रमाणात शहराकडे वळू लागली आणि नाभिक समाजाच्या स्थितीमध्ये कालानुरुप बदल होत गेले ते पुढीलप्रमाणे.

**१९ व्या शतकातील नाभिक समाज :-**

गावगाड्यातल्या पारंपारिक पद्धतीत उपजिविका होती पण व्यवहार रोखीत नव्हते. त्यामुळे नाभिक समाज हा गावगाड्याच्या बलुत्यावर जिवन जगत होता. तत्कालीन नाभिक समाजाचे वर्णन करतांना रसेल सांगतात की, त्यांच्याजवळ चामड्याची पिशवी आणि लागणारे संबंधित साहित्य असायचे. नाभिक समाजाला त्याच्या कामाचा मोबदला धान्याच्या स्वरूपात दिला जाई आणि त्याचा हिशोब घरात किती पुरूष आहेत यावरून केला जाई. मध्य भारतातील सौगोर भागात नाभिकांना घरातील प्रत्येक पुरूषामागे साधारण नऊ किलो धान्य दरवर्षी मिळे.

नाभिक समाजाला समाज रचनेत गौण स्थान असले तरी गावच्या रोजच्या व्यवहारात तो अतिशय महत्वाचा घटक मानला जातो. नाभिक समाजाला फार मोठी सामाजिक परंपरा आहे. इ.स. १९ व्या शतकात महात्मा फुले यांनी विधवा केशवपनाला विरोध केला असतांना नाभिक समाजाने हे अपवित्र काम यापुढे करणार नाही म्हणून सामुदायिक संप केला होता. सामाजिक सुधारणावादी चळवळीला जाहीरपणे कृतिशील पाठिंबा देणारा हा पहिला समाज होय.  या काळात नाभिक समाजाला गावातील सार्वजनिक कार्यात मशाल धरणे, गावातील जत्रेच्या निमंत्रणपत्रिका, उत्सवाची निमंत्रणे इतर गावी पोहचविण्याचे काम, लग्न समारंभातील कार्य अश्या प्रकारची कनिष्ठ दर्जाची कामे नाभिकांकडून करून घेतली जात असे. त्याचप्रमाणे जळवा लावणे, शरीरावरील गळवे कापून काढणे, इत्यादी कामे नाभिक समाजातील लोक करीत असे. रसेल सांगतात की, युरोपातही नापित हेच काम करीत आणि त्यांना बार्बर सर्जन म्हणतात.

स्वत:च नाभिक समाजाचे असलेले डॉ. ईश्वर नंदपूरे यांनी एकंदरच बलुतेदारीत मोडणाऱ्या सर्व जातींच्या सध्यास्थितीचे माहिती देणारे एका 'बलुतेदाराची स्मरणगाथा, वेदना आणि इतिहास' या पुस्तकातून तत्कालीन समाजाचे वर्णन त्यांनी केलेले आहे. एकंदरित एकोणविसाव्या शतकामध्ये नाभिकांना हिनतेची वागणूक दिली जात असून या काळात ह्या समाजाची स्थिती दयनीय असल्याचे आढळते.

**नाभिक समाजाची बदलती परिस्थिती :-**

समाज हा परिवर्तनशील आहे. असा कोणताही समाज नाही जो परिवर्तनाच्या प्रक्रियेने प्रभावित झालेला नाही. आज समाज बदलत आहे. सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक क्षेत्रात झपाट्याने परिवर्तन होत आहे. शिक्षणाशिवाय कुठलाही समाज हा खऱ्या अर्थाने विकसनशील श्रेणीत प्रवेश करू शकत नाही.

१९ व्या शतकातील बलुतेदारी पद्धती मध्ये काळानुरूप कालपरत्वे परिवर्तन घडून आलेले दिसते. आजच्या काळात मोबदल्याचे स्वरूप बदलले आहे. 'दाम करी काम' ही निती विकसित झाली आहे. आज पैश्याच्या स्वरूपात मोबदला घेतला जातो. परंपरागत व्यवसायाचे स्वरूप बदलले आहे. नाभिक समाजामध्ये परिवर्तनाच्या नवीन वाटा शोधून समाज आर्थिक, सामाजिक, राजकीय दृष्टीकोनातून कसा विकसित होईल यासाठी प्रयत्न होत असल्याचे निदर्शनास येते.

नाभिक समाजाच्या विकासासाठी बदलत्या काळाची पावले ओळखून त्या दृष्टीने परिवर्तनशील प्रयत्न केला जात आहे. त्यामुळे आज नुसताच नाभिक समाज केशकर्तण करणारा उरला नसून नव्या क्षितीजावर वाटचाल करीत असल्याचे निदर्शनास येते. आधुनिकीकरण आणि तांत्रिकीकरणाच्या प्रसारामुळे नाभिक समाजात नवनविन विचार प्रवाह निर्माण झाले आहे. शिक्षणामुळे पारंपारिक व्यवसायाला कौशल्य आणि तंत्राच्या जोडीने उच्च स्वरूप प्राप्त झाले आहे.

शिक्षणाच्या माध्यमातून नाभिक समाजात शिक्षणाचा सकारात्मक परिणाम बघायला मिळतो. नाभिक समाजामध्ये साक्षरतेचे प्रमाण वाढलेले आहे. शिक्षणामुळे पारंपारिक व्यवसायाबरोबर नौकरी करणाऱ्यांचे प्रमाण वाढले. शिक्षण घेवून स्वत:च्या पायावर उभे राहून सन्मानाने जीवन जगता यावे अशी सकारात्मक आणि विकासात्मक मतप्रणाली नाभिक समाजामध्ये निर्माण होत असतांना दिसते. शिक्षणाविषयी समाजातील लोक जागृक झालेले आढळून येतात. याचबरोबर नाभिक समाजातील स्त्रियांच्या अध्ययनाचा विचार केला असता नाभिक समाजातील आज बहुतांश स्त्रियांनी समाजात होणारे परिवर्तन स्विकारले आहे. नाभिक समाजात स्त्रियांच्या मताचा विचार करण्यात येतो असे दिसून येते.

विविध संशोधकांनी विविध लेखांतुन संशोधनातून नाभिक समाजाच्या स्थितीचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला.  विविध संशोधनाअंती असे आढळले की, नाभिक समाजातील लोकांचा परिणामी नाभिकांच्या परंपरागत व्यवसायाला कनिष्ठ दर्जाची वागणूक, त्यांना हिन समजल्यामुळे तसेच शिक्षणाच्या सोयींचा अभाव या सगळ्यामुळे आर्थिक विकासाच्या प्रक्रियेतून समाज काही अंशी मागासलेला दिसतो परंतु आधुनिक काळामुळे शिक्षणाचा वाढत्या प्रचारामुळे नाभिक समाजातील लोकांचे विचार आणि दृष्टीकोन बदलला आहे.  या बदलामुळे समाजामध्ये परिवर्तन आढळून येते.

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Humanities And Indian Knowledge System Feb'26
Issue–I(I), Volume–XIV

आज नाभिक समाजावर अध्ययने होवू लागली. बालाजी तुरेकर यांनी केशकर्तनालय व्यवसायाचा आर्थिक अभ्यास करतांना जातीवरुन व्यवसाय की, व्यवसायावरुन जात असा प्रश्न मांडला. सुभाषचंद्र सिंह यांनी "नाई जाती की सामाजिक स्थिती" यामध्ये त्यांनी नाभिक समाजाची स्थिती सुधारायची असेल तर चांगल्या शिक्षणाची गरज आहे आणि समाजपरिवर्तन हे शिक्षणानेच होवू शकते असे मत मांडले. सुभाषचंद्र सिंह यांनी त्यांच्या प्रबंधात मांडलेले मत हे आजच्या नाभिक समाजाच्या विकासाला दुजोरा देणारे आहे. नाभिक समाजात शिक्षणामुळे, समाजाबद्दल जागृती निर्माण झाली त्यामुळे आत्मसन्मान वाढला. हळुहळु या समाजातील लोक राजकीय क्षेत्रात एकत्र येवू लागले. नाभिक समाजातील गुलजारी लालनंदा यांनी पंतप्रधान म्हणून कार्य केले. तसेच बिहार राज्याचे मुख्यमंत्री कर्पुरी ठाकुर या सारखे राजकीय क्षेत्रातील व्यक्तिमत्व या समाजात होवून गेले. आजही नाभिक समाजातील लोक राजकीय क्षेत्रात आपले पाय घट्ट रोवू पाहात आहे. समाजामध्ये अनेक सामाजिक संघटनांनी नाभिक समाजाच्या संघटित अस्तित्वासाठी कार्य सुरु केले. "महाराष्ट्र राज्य नाभिक समाज महासंघ" तसेच स्थानिक पातळीवरील समाज संघटनामुळे समाजात बदल घडून येत असल्याचे दिसते.

आज समाजातील लोकांच्या दृष्टीकोनात बदल झालेला आहे. अंधश्रद्धा रूढी, परंपरा या गोष्टीवरून समाजातील लोक तर्कवाद प्रगतीवादाकडे झुकले. एकूणच नाभिक समाजात झालेला बदलामुळे नाभिक समाजाची नक्कीच विकासाच्या दृष्टीने वाटचाल सुरू असल्याचे आढळून येते. नाभिक समाज आणि भारतीय ज्ञान परंपरा यांचा संबंध पुढीलप्रमाणे

**भारतीय ज्ञान परंपरा आणि नाभिक समाज यांच्या संबंधावरील चर्चा :-**

भारतीय ज्ञान परंपरा ही हजारो वर्षापासून चालत आलेली परंपरा जी आजच्या काळातील आव्हांनासाठी मार्गदर्शक आहे. नाभिक समाज हा भारतीय समाज रचनेतील एक महत्वाचा घटक आहे. ज्याला पुरोगामी विचारांचा वारसा आहे. समकालीन काळात या परंपरेचा भाग म्हणून नाभिक समाज स्वत:ची ओळख निर्माण करीत आहे.

भारतीय ज्ञानपरंपरा ही केवळ ग्रंथाधारित नसून समाजजीवनाशी जोडलेली जिवंत परंपरा आहे. पारंपारिक ज्ञानासोबतच नाभिक समाज आधुनिक काळातही आपली सामाजिक आणि व्यावसायीक भूमिका पार पाडत आहे. नाभिक समाजाची परंपरा आणि भारतीय ज्ञान परंपरा यांचा समन्वय साधून आधुनिक शिक्षण व तंत्रज्ञानाच्या मदतीने नाभिक समाजातील व्यक्ती या ज्ञानाचा उपयोग करून स्वत:च्या समाजाचा विकास करीत आहेत. ज्यामुळे ही परंपरा अधिक समृद्ध होत आहे.

**निष्कर्ष :**

भारतीय ज्ञान परंपरा ही अत्यंत समृद्ध आणि अद्वितीय आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० हे भारतीय शिक्षण व्यवस्थेच्या विकासात महत्वपूर्ण भूमिका बजावते. भारतीय ज्ञान प्रणालीमध्ये विद्यार्थ्यांच्या शारिरीक, मानसिक, सामाजिक, सांस्कृतिक, चारित्र्य आणि नैतिक मुल्यांच्या विकासावर भर दिला जातो. ते भारतीय ज्ञानप्रणालीवर आधारित ज्ञान, विज्ञान, तत्वज्ञानाच्या एकात्मिकतेवर भर देते. समाज पारंपारिक ज्ञानाचा आदर करण्यास उपयुक्त ठरते. याच दिशेने विद्यापीठ अनुदान आयोगाने नविन पिढीला भारतीय ज्ञान परंपरेशी जोडण्यासाठी एक नाविण्यपूर्ण उपक्रम हाती घेतला आहे. याच अंतर्गत प्रत्येक विषयाच्या अभ्यासक्रमात भारतीय ज्ञान परंपरेशी संबंधित संकल्पना जोडल्या जात आहे. याचा उपयोग निश्चितच नविन पिढीतील विद्यार्थ्यांमध्ये भारतीय असल्याचा अभिमान जागृत करेल. भारतीय ज्ञान परंपरेच्या माध्यमातून आज प्रत्येक समाज शैक्षणिक दृष्ट्या अग्रेसर आहे. भारतीय ज्ञान परंपरा हा आपला अभिमान आहे. आणि समाजातील तरूण पिढीमध्ये ही जाणीव निर्माण करणे आपली जबाबदारी आहे. भारतीय ज्ञान परंपरेच्या मार्गदर्शक तत्वांचा स्विकार नाभिक समाजात देखील स्विकारलेला दिसतो. याच कारणाने पूर्वीच्या काळात नाभिक समाजाला जे दुय्यम स्थान, गौणत्वाची भावना दिली जात असते. त्यामध्ये आज निश्चितच बदललेली परिस्थिती बघायला मिळते. आज नाभिक समाजातील तरूण, नौकरी, उद्योग, शेती, व्यवसाय राजकारण या क्षेत्रात पुढे येत आहे. एकूणच भारतीय ज्ञान परंपरेमुळे समाजाला नविन दिशा प्राप्त होतांना दिसते.

एकंदरीत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या प्रभावी अंमलबजावणीतून भारतीय ज्ञान परंपरा समृद्ध मार्गावर चालत नवीन पिढी सर्वगुण संपन्न आणि स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी तयार होईल निश्चित आहे.

**संदर्भ ग्रंथसूची :**

- देवगावकर एस.जी. 'महाराष्ट्रातील निवडक जाती, जमाती' श्री. साईनाथ प्रकाशन नागपूर २००५.
- डॉ. मदन जी आर 'परिवर्तन एवं विकास का समाजशास्त्र विवेक प्रकाशन दिल्ली २००६.

- शहा घनश्याम 'भारतातील सामाजिक चळवळी', डायमंड पब्लिकेशन पुणे २००८.
- सांगळे सुनिल 'जातिव्यवस्था आणि महाराष्ट्रातील जाती जमाती' ग्रंथाली प्रकाशन डिसेंबर २०१९.
- सिरोला सागर डॉ. सिरोला देवकी 'भारतीय ज्ञान परंपरा एवं राष्ट्रीय शिक्षा निती २०२०' International Journal For Multidisciplinary Research (ISFMR) E-ISSN 2582-2162.
- पटेल कांतिलाल आर २१ वी सदी मे भारतीय ज्ञान प्रणाली का समावेश मार्च २०२५ 'International Journal Scientific Research in Humanities and social Sciences ISSN – 3048-6178.
- प्रा. डॉ. वाघ शैलेशकुमार आबासाहेब 'भारतीय ज्ञान प्रणाली', अथर्व पब्लिकेशन २ सप्टेंबर २०२४.
- डॉ. रचना 'भारतीय ज्ञान परंपरा आणि वैज्ञानिकता' Shodkosh : Journal of Visual and Performing Arts July December 2023 ISSN : 2582-7472
  - परब सचिन 'रिंगण' (संत शिरोमणी सेना महाराज विशेषांक) परब प्रकाशन २०२५.
  - चव्हाण शशिकांत 'नाभिकांची परिवर्तन यात्रा' अव्दैत प्रकाशन मुंबई २००६.
  - देशमुख 'हजामत पंच तारांकित' दैनिक लोकसत्ता ३ जुलै २००५ पान नं. ३.